**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सोलापुर ग्रामीण **P.S.(ठाणे):** माळशिरस

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0425 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 16/10/2024 20:45

2.

| **S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 16/10/2024

**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 16/10/2024

**Time From (वेळेपासून):** 11:58 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:24 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 16/10/2024 **Time (वेळ):** 20:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 028

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 16/10/2024 20:45 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** माळशिरस नगरपंचायत कार्यालय, माळशिरस,माळशिरस

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** श्री. संतोष पांडुरंग माने
**(b) Father's Name (वडील चे नाव) :** पांडुरंग माने
**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1983
**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**
**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
**(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | घर नं11,म्हसवड रोड,देशमुख कलनी,माळशिरस,माळशिरस,माळशिरस , सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | घर नं11,म्हसवड रोड,देशमुख कलनी,माळशिरस,माळशिरस,माळशिरस , सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**
**(j) Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-8888454089

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. विकास गोरख पवार | | वडील का नाम : गोरख पवार | 1. चिखलठाण,करमाळा;करमाळा , सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादी जबाब दिनांक 16.10.2024

मी श्री.संतोष पांडुरंग माने वय 41 वर्षे धंदा प्राध्यापक रा. घर नं. 11 देशमुख कॉलनी म्हसवड रोड ता. माळशिरस सोलापूर मो.नं. 8888454089 समक्ष फिर्यादी जबाब देतो की,.

मी वरील ठिकाणी राहण्यास असुन, मी समीर गांधी कला महाविदयालय, माळशिरस येथे प्राध्यापक म्हणून नोकरीस आहे. त्यावर येणा-या उत्पन्नावर माझा उदरनिर्वाह चालतो.

मी दि. 18.09.2024 रोजी माळशिरस येथील बिनशेती गट नं. 2329/प/7 येथील 1.86 आर.चौ. मी. जागा सौ.मनिष धनंजय गायकवाड यांचेकडून खरेदीखताव्दारे विकत घेतलेली होती.त्याचा खरेदीखत दस्त नं.म. स.र. 2470/2024 असा आहे. सदर ठिकाणी मला घर बांधावयाचे असल्यामुळे सदर जागा खरेदी खताची नोंद ही माळशिरस नगरपंचायत येथे करुन, मालमत्ता उतारा प्राप्त करणे आवश्यक आहे. त्यासाठी मी माझ्या वर नमूद बिनशेती जागेच्या खरेदीखताचे छायांकित प्रत जोडून माळशिरस नगरपंचायत येथील कर विभागात अर्ज करुन दि. 15.10.2024 रोजी माळशिरस नगरपंचायत कार्यालय येथील कर निर्धारन अधिकारी श्री. विकास पवार यांना भेटलो असता, त्यांनी मी केलेला अर्ज व खरेदी खत पाहून नोंदणी फी, मालमत्ता उतारा फी व घरपट्टी असे एकूण 2780/- रु. ची शासकीय फी व त्यावर त्यांचेसाठी 1,500/- रु. असे एकूण मिळून 4,280/- रु. दयावे लागतील असे सांगीतले. त्यावेळी मी त्यांना वरचे 1,500/-रु. कशाचे असे विचारले असता, त्यांनी तुमचे काम लवकर करुन देण्यासाठी म्हणून त्यांना 1,500/-रु. दयावे लागतील असे सांगीतले. त्यावेळी मी त्यांना केलेल्या अर्जाची पोहच मागीतली असता, त्यांनी पैसे दिल्यानंतर अर्जाची पोहच, पावती व उतारा दिली जाईल असे मला सांगीतले होते. माझ्याकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत मी आज रोजी अँन्टी करप्शन ब्युरो सोलापूरचे पोलीस उप अधीक्षक श्री. गणेश कुंभार यांना फोन करुन माहिती दिली होती.

त्यानंतर काहीवेळाने पोउपअधी. श्री. कुंभार, सापळा पथक व पंच असे शासकीय वाहनाने मी सांगीतल्याप्रमाणे माळशिरस येथील पालखी स्थळ येथील मैदानावर आले. व त्यांनी सापळा पथकातील अंमलदार यांना वाहनातून खाली उतरवून मला शासकीय वाहनात बसवले व दोन शासकीय पंच श्री. दिगंबर डोईफोडे, तलाठी, सजा भोसे व श्री. पियुष भोसले, तलाठी, सजा ओझेवाडी तहसिल कार्यालय पंढरपूर यांची ओळख करुन दिली. त्यानंतर पोउपअधी. श्री. कुंभार यांचे सुचनेवरून दोन्ही पंचाना मी माझे वरील प्रमाणे नाव गाव व माझी माळशिरस नगरपंचायत येथील कर निर्धारण अधिकारी श्री. विकास पवार यांचे विरुध्दची वरील प्रमाणे लाच मागणीची तक्रार सांगितली. पोउपअधी. श्री. कुंभार याचे सांगण्यावरुन मी माझी तक्रार लेखी स्वरुपात लिहुन दिली. त्यावर मी, पोउपअधी.श्री. कुंभार व दोन्ही पंच यांनी वाचुन सहया केल्या.

त्यानंतर पोउपअधी. श्री. कुंभार यांनी मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करणे असल्याचे आम्हास सांगितले. त्यासाठी आम्हास व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याविषयी माहिती दिली व त्यामध्ये नवीन मेमरीकार्ड टाकण्यात आले. त्यानंतर पोउपअधी. श्री. कुंभार यांनी मला व माझ्या सोबत पंच नं 1 डोईफोडे यांना सुचना दिल्या की, आम्ही माळशिरस नगरपंचायत येथे जावुन कर निर्धारण अधिकारी श्री. विकास पवार यांची भेट घेवुन तेथे त्याच्याकडे वर नमूद प्रलंबित कामाचे अनुषंगाने चर्चा करावी. श्री. विकास पवार यांनी लाचेची मागणी केल्यास त्यामध्ये तडजोड करावी व सध्या पैसे आणले नसुन नंतर आणून देत असल्याबाबत सांगावे व सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत यावे.अश्या सविस्तर सुचना मला व पंच नं.1 डोईफोडे यांना दिल्या.

त्यानंतर मला व पंच नं.1 डोईफोडे यांना माळशिरस नगरपंचालय येथे पाठविणे अगोदर पोउपअधी. श्री. कुंभार यांनी व्हॉईसरेकॉर्डर चालु करुन माझ्या गळयात अडकावून आम्हास कर निर्धारण अधिकारी श्री. विकास पवार यांचे भेट घेवून पडताळणी करण्यास जाण्यास सांगितले. त्यावरून मी, पंच नं.1 डोईफोडे असे माझे मोटारसायकलने माळशिरस नगरपंचाय येथील कर विभागात जावुन कर निर्धारण अधिकारी श्री. पवार यांची भेट घेवुन माझ्या खरेदी

खताचे नोंद व मालमत्ता उताराबाबत चर्चा करत असताना, कर निर्धारण अधिकारी श्री. पवार यांनी कॉल्युलेटरवर माझ्याकडे नोंदणी फी, मालमत्ता उतारा फी व घरपट्टी अशी शासकीय फीचे 2780/- रु. व त्यावर लाचेचे 1,500 /- रु. रक्कम असे एकूण 4,280/- रुपयांची मागणी केली. त्यामध्ये मी तडजोड करण्याचा प्रयत्न केला असता, त्यांना पुन्हा कॉल्युलेटरवर हिशोब करुन "दिड काहीच नाहीत" असे म्हणून माझ्याकडे वरील प्रमाणे 1,500/- रुपये लाचेची मागणी केली. त्यावेळी मी घेवून येतो असे बोललो असता,"अजून आणले नाहीत का, या लवकर इलेक्शन डयुटी टाकली आहे आमच्या अजून" असे श्री. पवार मला म्हणाले, त्यावर मी त्यांना मला वाटल काहीतरी काम कराल असे म्हणून मी व पंच श्री. डोईफोडे असे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. तेथे पोउपअधी. श्री. कुंभार यांनी माझ्या गळ्यातील रेकार्डर काढून पंच नं.1 डोईफोडे व मला हकीकत विचारून घेतली. त्यामध्ये आम्ही उपरोक्त प्रमाणे घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर पोउपअधी. श्री. कुंभार, व पंचांनी रेकॉर्डरमध्ये माझ्यात आणि कर निर्धारण अधिकारी श्री.पवार यांच्यात झालेले संभाषण त्यांच्याकडील लॅपटॉपला व्हाईस रेकॉर्डर जोडून ऐकले. त्यामध्ये कर निर्धारण अधिकारी श्री. विकास पवार यांनी खरेदी खाताची नोंद करुन, मालमत्ता उतारा देण्यासाठी माझ्याकडे शासकीय फी 2780/- रु. व त्यावर 1500/- रुपये रक्कम लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम माळशिरस नगरपंचायत कार्यालय येथे घेवुन येण्यास सांगीतले असल्याचे स्पष्ट झाले.

त्यानंतर पोउपअधी. श्री. कुंभार यांच्या सुचनेवरून मी कर निर्धारण अधिकारी श्री.पवार यांना लाच म्हणुन देण्यासाठी माझ्याकडे असलेले 4,280/- रूपये हजर केले. त्यात 500/- रूपये दराच्या 08,200/- रूपये दराच्या 01,50/- रूपये दराच्या 01,20/- रूपये दराच्या 01,10/- रूपये दराच्या 01 अशा नोटा होत्या. मी हजर केलेल्या नोटांचे क्रमांक.पोउपअधी. श्री. कुंभार यांचे सुचनेवरुन पोहवा/सोनावणे यांनी एका कौ-या कागदावर लिहुन घेवून त्याचेवर पोउपअधी. श्री. कुंभार व दोन्ही पंचानी सह्या केल्या. सदर नोटांना अँथ्रासीन पावडर लावण्याचा,त्याचे प्रात्याक्षीक करण्याचा व सापळा कारवाईमध्ये करावयाच्या कामाच्या सुचनांचा सविस्तर सापळापूर्व पंचनाम्याची कार्यवाही सदर ठिकाणी शासकीय कार्यालयात करण्यात आली. सदर अँन्थ्रासिन पावडर लावलेल्या नोटा माझ्या शर्टच्या पुढील डाव्या बाजुच्या खिशामध्ये सुरक्षितरित्या ठेवण्यात आल्या.

त्यानंतर यातील कर निर्धारण अधिकारी श्री. विकास पवार यांच्यावर माळशिरस नगरपंचायत कार्यालय येथे परिसरात लाचेचा सापळा आयोजीत करण्याचे अनुषगाने पोउपअधी श्री. कुंभार यांनी व्हॉईसरेकॉर्डर चालु करुन माझ्या गळयात अडकावून मी व पंच नं 1 डोईफाडे असे माझ्या मोटारसायकलवरुन व पोउपअधी श्री. कुंभार व पंच न 02,सापळा पथक असे शासकीय वाहनाने असे आमचे पाठीमागे येवुन माळशिरस नगरपंचायत कार्यालय येथे सापळा लावुन थांबलो मी व पंच क्र 01 डोईफाडे असे माळशिरस नगरपंचायत कार्यालय येथील कर विभागात कर निर्धारण अधिकारी श्री. विकास पवार यांचेकडे जावून त्यांची भेट घेतली असता,मी त्यांना किती द्यायचे असे विचारले असता,"सांगीतले की मगाशी" असे मला म्हणाले, त्यावर मी पावतीचे किती असे विचारले असता, श्री. पवार मला "2780" असे म्हणाले, त्यावर मी त्यांना टोटल किती झाले असे विचारले असता श्री. पवार यांनी कॉल्युलेटरवर हिशोब करुन "4280" रुपये असे म्हणून सदर रक्कम टेबलावर ठेवण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी माझ्या शर्टाच्या पुढील डाव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवलेली लाच रक्कम उजव्या हाताने काढून टेबलावर ठेवून त्यांच्याकडे पावतीची मागणी केली असता, पावती करणा-या मॅडम बाहेर गेल्या असून, मालमत्ता उतारा तयार झाल्यानंतर उतारा व पावती एकदमच देतो असे सांगीतले. त्यानंतर मी कार्यालयातून बाहेर येवून लाच रक्कम स्विकारलेचा नियोजित इशारा केला. त्यावरुन पोउपअधी. श्री. कुंभार व पंच 02 सापळा पथक असे सदर ठिकाणी येवुन कर निर्धारण अधिकारी श्री. विकास पवार यांना पकडले

सदर ठिकाणी पोउपअधी श्री. कुंभार यांनी श्री. विकास पवार यांचे नाव गांव व पद विचारले असता,त्यांनी त्यांचे नाव श्री. विकास गोरख पवार वय 38 वर्षे पद- कर निर्धारण व प्रशासकीय अधिकारी माळशिरस नगरपंचायत असे असल्याचे सांगितले. सदर ठिकाणी लाचेच्या सापळ्यातील प्राथमिक तपासण्या करून पुढील सविस्तर पडताळणी सापळापुर्व व यशस्वी सापळा पंचनामा तसेच इतर कार्यवाही ही शासकीय विश्रामगृह माळशिरस येथे पूर्ण करण्यांत आली.

तरी दिनांक 16.10.2024 रोजी 11.58 वा. ते 13.24 वा.चे दरम्यान आरोपी लोकसेवक श्री.विकास गोरख पवार वय 38 वर्षे, पद- कर निर्धारण अधिकारी माळशिरस नगरपंचायत रा. 58 फाटा माळशिरस ता. माळशिरस जि. सोलापूर मुळ रा. चिखलठाण ता. करमाळा जि. सोलापूर यांनी माझे खरेदी खताची नोंद करुन मालमत्ता उतारा देण्यासाठी माझ्याकडे शासकीय फी 2780/- रु. व त्यावर लाचेची रक्कम 1500/- रुपये असे एकूण 4,280/- रुपयांची मागणी करुन, सदर रक्कम त्यांनी स्विकारुन त्यापैकी त्यांचेसाठी 1,500/- रुपये लाच रक्कम स्विकारल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांनी सांपत्तीक फायदा मिळवुन गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले आहे म्हणुन माझी श्री.विकास गोरख पवार वय 38 वर्षे पद- कर निर्धारण व प्रशासकीय अधिकारी माळशिरस नगरपंचायत यांचेविरूध्द

कायदेशीर फिर्याद आहे.
माझा वरील फिर्यादी जबाब हा संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष हा फिर्यादी जबाब दिला. स.ता.म.

(गणेश कुंभार)
पोलीस उप-अधीक्षक,
अँन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Narayan Vinayakrao Pawar (I (Inspector)) / DGPNVPM7401

or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबरं तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** Narayan Vinayakra
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** DGPNVPM7401